**भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३३०/२०१३ मधील**

**अर्ज निशाणी क्रमांक २६ खालील आदेश**

**( CNR- MHWS050001842012)**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांचेतर्फे भुसंपादन अधिनियम १८९४ कलम १२(२) ची नोटीस, दिनांक २७.१२.१९९९ रोजीचे खरेदी खताची सत्यप्रत आणि दिनांक ५.९.२००९ रोजीचा मुल्यांकन अहवाल अभिलेखावर दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. गैरअर्जदार क्र. १ यांनी प्रस्तुतच्या अर्जास त्यांचे म्हणणे दिलेले नाही.अर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. पी.एम.भगत यांचा आणि गैरअर्जदार क्र. २ यांच्या तर्फे विधीज्ञ व्ही.टी.अकोटकर यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेल्या भुसंपादन अधिनियम १८९४ कलम १२(२) ची नोटीस, दिनांक २७.१२.१९९९ रोजीचे खरेदी खताची सत्यप्रत आणि दिनांक ५.९.२००९ रोजीचा मुल्यांकन अहवाल अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय ? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :-**

३. अर्जदार यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदार यांनी भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे आणि अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून विष्णू जेसा राठोड यांचे पुराव्याचे शपथपत्र आजरोजी दाखल केलेले

आहे. तरी, भुसंपादन अधिनियम १८९४ कलम १२(२) ची नोटीस, दिनांक २७.१२.१९९९ रोजीचे खरेदी खताची सत्यप्रत आणि दिनांक ५.९.२००९ रोजीचा मुल्यांकन अहवाल दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदार यांनी खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स अर्जदार यांनी भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे आणि अर्जदारांतर्फे साक्षीदार क्र. १ म्हणून अर्जदार क्र.४ विष्णू जेसा राठोड यांचे पुराव्याचे शपथपत्र आजरोजी दाखल केलेले आहे. तसेच त्या कागदपत्राच्या अनुषंगाने गैरअर्जदार यांना साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. ती कागदपत्रे अभिलेखावर आली तर प्रस्तुतचा रेफरंन्स गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात त्यामुळे ते अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.२६ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना संबंधीत कागदपत्रे दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.16 17:13:37 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक : १६.२.२०२६

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.2.2026 |